# पाण्याचा बापतिस्मा



आशीष रायचूर

**विनामूल्य वाटपासाठी**
ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2024

**संपर्क सूचना**
All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्‌त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

**आर्थिक भागिदारी**
या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे “ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी” हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती**

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च ॲप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org

(Marathi — Water Baptism)

# पाण्याचा बापतिस्मा

# अनुक्रमणिका

परिचय

1. पश्चातापाचे चिन्ह 1

2. सर्व नीतिमत्व पूर्ण करणे 6

3. तुम्ही त्याचे शिष्य आहा ही साक्ष 12

4. येशू ख्रिस्तामधील तुमच्या विश्वासाची साक्ष 17

5. येशूसोबत आपल्या समानतेची साक्ष 22

6. उत्तम विवेकबुद्धीचा प्रतिसाद 27

7. काही सर्वसामान्य प्रश्नांची उत्तरे 30

# परिचय

येशू ख्रिस्ताठायी विश्वासणारे म्हणून आमच्या प्रवासात बापतिस्मा हा एक महत्वपूर्ण अनुभव आहे. आम्ही सर्व ज्यांनी येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याचा आणि येशू ख्रिस्ताचे अनुसरण करण्याचा अनुभव घेतला आहे, आपल्या जीवनात कुठल्यातरी क्षणी हे महत्वाचे पाऊल उचलतील. पाण्याचा बापतिस्मा घेण्याची आज्ञा प्रभू येशू ख्रिस्ताने त्या सर्वांना दिली आहे जे त्याच्या मागे चालण्याची निवड करतात. म्हणून या आज्ञेचे पालन केले पाहिजे. पाण्याचा बापतिस्मा घेण्याची तयारी करीत असतांना हा देवाच्या वचनाचा सोपा अभ्यास पाण्याच्या बापतिस्म्याचा अर्थ आणि महत्व समजण्यात आपली मदत करील.

आम्ही पाण्याच्या बापतिस्म्यासंबंधी सहा महत्वाची सत्ये येथे मांडणार आहोत:

1) पश्चातापाचे चिन्ह,

2) सर्व धर्माचरण पूर्ण करणे,

3) तुम्ही त्याचे शिष्य आहा ही साक्ष,

4) येशू ख्रिस्ताठायी आपल्या विश्वासाची साक्ष,

5) येशूसोबत आपल्या समानतेची साक्ष,

6) उत्तम विवेकबुद्धीचा प्रतिसाद.

आम्ही काही सामान्य प्रश्नांची उत्तरे देखील देत आहोत जी लोक पाण्याच्या बापतिस्म्याविषयी विचारतात.

देव तुम्हास आशीर्वादित करो!<br>
आशीष रायचूर

# 1
# पश्चातापाचे चिन्ह

नवीन करारात, पाण्याच्या बाप्तिस्म्याची घोषणा करीत येणारी आणि लोकांना बाप्तिस्मा देणारी पहिली व्यक्ती बाप्तिस्मा करणारा योहान होता. योहान येशू ख्रिस्ताचा अग्रदूत म्हणून आला. येशूची सेवा करण्यासाठी लोकांना तयार करणे आणि येशू ख्रिस्ताची जगाशी ओळख करून देणे ही त्याची जबाबदारी होती.

**मार्क 1:4,5**

4 **त्याप्रमाणे पापांच्या क्षमेसाठी पश्चात्तापाचा बाप्तिस्मा** (**ग्रीक** *बॅप्टॅज़ो*) **घ्यावा अशी घोषणा करत बाप्तिस्मा** (**ग्रीक** *बॅपटिस्मा*) **करणारा योहान अरण्यात प्रकट झाला.**

5 **तेव्हा सगळा यहूदीया देश व सर्व यरुशलेमकर त्याच्याकडे लोटले आणि त्यांनी आपापली पापे पदरी घेऊन यार्देन नदीत त्याच्यापासून बाप्तिस्मा घेतला.**

योहानाचा बापतिस्मा पश्चातापाचा बापतिस्मा होता. याचा अर्थ हा आहे की ज्यांनी पश्चाताप केला ते आले आणि योहानाने त्यांस बापतिस्मा दिला.

“पश्चाताप करणे” आणि “पश्चाताप” हे शब्द ग्रीक भाषेतील *‘मेटॅनोईया’* या शब्दावरून आले आहेत ज्याचा अर्थ आहे “मनाचा बदल किंवा हेतूमध्ये बदल,” आणि यात नेहमीच बऱ्यासाठी बदल समाविष्ट असतो. नवीन करारात, पश्चातापाचा संबंध मनाच्या बदलाशी आणि आमच्या पापांपासून आणि पापमय मार्गापासून परमेश्वराकडे वळणे, त्याच्या मार्गांचा अवलंब करण्याची निवड करणे, आणि हेतूंमध्ये बदल यांच्याशी आहे.

प्रथमतः पश्चातापाचा परिचय योहानाने घडवून दिला आणि त्याचा प्रचार केला, पश्चातापासोबत खालील गोष्टी येतात:

- पापांचा अंगीकार (मार्क 1:5). याचा अर्थ हा होता की त्यांनी परमेश्वरासमक्ष त्यांची पापे ओळखली आणि ती कबूल केली.
- *पश्चातापास योग्य अशी फळे* (लूक 3:8). याचा अर्थ असा होता की त्यांचा पश्चाताप त्यांच्या जीवनशैलीत झालेल्या बदलाद्वारे दिसून येत होता (लूक 3:11-14).

म्हणून, तो प्रथम अंतःकरणाचे परिवर्तन होता (विचार करण्याच्या पद्धतीत) ज्याचा परिणाम नंतर जीवन परिवर्तनात घडून आला (जीवन जगण्याची पद्धत).

"बापतिस्मा देणे" किंवा "बापतिस्मा घेणे" हा शब्द ग्रीक भाषेतील *'बॅपटिजो,'* वरून आला आहे, ज्याचा अर्थ आहे "बुडवणे, डुबवणे, जल स्नान देणे, जल मग्न करणे, पाण्यात बुडवण्याद्वारे स्वच्छ करणे." बापतिस्मा जी बापतिस्मा घेण्याची क्रिया आहे, ग्रीक शब्द *'बॅपटिस्मा'* या शब्दापासून निघाला आहे ज्याचा अर्थ आहे "बुडवणे," "डुबकी." शब्दांच्या अर्थावरून, तसेच नवीन करारातील बापतिस्म्याच्या प्रथेवरून आणि पाण्याच्या बापतिस्म्याच्या आत्मिक महत्वावरून (या पुस्तकात पुढे आपण त्याचा अभ्यास करणार आहोत) हे स्पष्ट आहे की जेव्हा व्यक्ती पाण्याचा बापतिस्मा घेतो, तेव्हा तो पूर्णपणे पाण्यात बुडवला जातो किंवा बुडतो. **नव्या करारातील पाण्याचा बापतिस्मा व्यक्तीवर पाणी शिंपडणे नव्हे, तर त्या व्यक्तीस पाण्यात पूर्णपणे बुडवणे आहे.**

## पश्चाताप कर आणि विश्वास कर

पश्चातापाचा संदेश राज्याच्या सुवार्तेवर विश्वास ठेवण्याद्वारे देवाच्या राज्यात प्रवेश करण्याचे निमंत्रण होते.

**मार्क 1:14,15**
**14 योहानाला अटक झाल्यानंतर येशू देवाच्या राज्याची, सुवार्ता गाजवत गालीलात आला व म्हणाला,**
**15 “काळाची पूर्णता झाली आहे व देवाचे राज्य जवळ आले आहे; पश्चात्ताप करा व सुवार्तेवर विश्वास ठेवा.”**

जसे प्रेषित पौलाने नंतर इफिसच्या विश्वासणाऱ्यांस समजाविले:

**प्रेषितांची कृत्ये 19:4**
**पौलाने म्हटले, “योहान पश्चात्तापाचा बाप्तिस्मा देत असे; तो लोकांना सांगत असे की, माझ्यामागून येणाऱ्यावर म्हणजे येशूवर तुम्ही विश्वास ठेवावा.”**

म्हणून प्रथम आपल्याजवळ पश्चाताप आहे जे मनाचे आणि हेतूचे परिवर्तन आहे. आम्हास हे कळते की आमचे मार्ग विनाशाकडे जातात. पापाच्या मार्गाने, जगाच्या मार्गाने, काळोखाच्या मार्गाने चालणे, किंवा आम्ही जो मार्ग अनुसरत होतो, तो आम्हास जीवनाकडे नेत नव्हता. आम्ही आपल्या मार्गासंबंधाने आपल्या मनात बदल घडवून आणतो. नंतर आपण, येशू ख्रिस्तामध्ये विश्वास करण्याची, तो आम्हाला देत असलेल्या तारणाच्या विनामूल्य कृपादानाचा स्वीकार करण्याची, आणि त्याच्या प्रकाशाच्या गौरवमय राज्यात प्रवेश करण्याची निवड करतो. आता आपण आपली विचारसरणी येशू ख्रिस्तानुसार आणि त्याच्या राज्यानुसार जुळवून घेतो. आपण पश्चाताप करतो आणि विश्वास ठेवतो.

## पश्चाताप करा, विश्वास करा, आणि बापतिस्मा घ्या

**मार्क 16:15,16**
**15 मग त्याने त्यांना सांगितले की, “सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा.**
**16 जो विश्वास धरतो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल.**

**प्रेषितांची कृत्ये 2:38,41**
**38 पेत्र त्यांना म्हणाला, “पश्चात्ताप करा व तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या; म्हणजे तुम्हांला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल.**
**41 तेव्हा ज्यांनी त्याच्या संदेशाचा स्वीकार केला त्यांचा बाप्तिस्मा झाला; आणि त्या दिवशी त्यांच्यात सुमारे तीन हजार माणसांची भर पडली.**

येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेवर विश्वास ठेवून पश्चाताप केल्यानंतर, आणि येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवल्यानंतर आपण बापतिस्मा घेण्यासाठी तयार होतो. पश्चाताप आणि पापांच्या क्षमेसाठी तसेच तो देत असलेल्या तारणासाठी विश्वास करणे पाण्याच्या बापतिस्म्याची पूर्वपात्रता आहे.

जेव्हा आपण पश्चाताप करतो आणि प्रभू येशू ख्रिस्तामध्ये विश्वास ठेवतो, तेव्हा पापापासून आणि त्याच्या परिणामांपासून आमचे तारण होते. अनंतकाळपर्यंत नरकात परमेश्वरापासून विभक्त होण्याऐवजी, आम्हास देवाची मुले बनविले जाते, सार्वकालिक विनाशापासून मुक्ति लाभते, आम्ही तारण प्राप्त करतो, आणि त्याच्या राज्याचा भाग बनतो. येशू ख्रिस्ताठायी विश्वासाने कृपेद्वारे आमचे तारण होते (इफिसकरांस पत्र 2:8). सार्वकालिक जीवन "परमेश्वराचे कृपादान" आहे आणि आम्ही करीत असलेल्या कोणत्याही कामाद्वारे आम्हास ते कमविता येत नाही (रोमकरांस पत्र 6:23). जेव्हा आम्ही प्रभू येशू ख्रिस्तामध्ये विश्वास ठेवतो तेव्हा आम्हास तारण प्राप्त होते (प्रेषितांची कृत्ये 16:31; रोमकरांस पत्र 10:13).

पाण्याचा बापतिस्मा असे काही आहे जो तारणाच्या अनुभवानंतर घडतो. पश्चाताप केल्यानंतर आणि येशू ख्रिस्तामध्ये विश्वास ठेवल्यानंतर आम्ही प्राप्त केलेल्या तारणाची ती अभिव्यक्ती आहे.

# मनन

1) “पश्चातापाचा” अर्थ काय आहे?
2) “बापतिस्मा” या शब्दाचा अर्थ काय आहे?
3) पाण्याचा बापतिस्मा घेण्यापूर्वी व्यक्तीच्या जीवनात काय घडले पाहिजे?
4) आपण पाण्याचा बापतिस्मा घेण्याची पूर्वपात्रता पूर्ण केली आहे काय?

# 2
# सर्व नीतिमत्व पूर्ण करणे

हे लक्षात घेणे फारच मनोरंजक आहे की पश्चात्तापाचा बाप्तिस्मा घेण्याविषयी घोषणा करण्याद्वारे बापतिस्मा करणाऱ्या योहानाने आपली सेवा सुरू केल्यावर, प्रभु येशू ख्रिस्त जो परमेश्वर असूनही मनुष्य बनला तो स्वतः बाप्तिस्मा करणारा योहान याच्याकडे पाण्यात बाप्तिस्मा घेण्यासाठी आला. प्रभु येशूठायी पश्चात्ताप करण्यासाठी कोणतेही पाप नव्हते. तो निष्पाप आणि परिपूर्ण होता, तो प्रत्येक क्षणी पित्याच्या आज्ञेत जगला. तो देवाचा कोकरु होता जो संपूर्ण जगाची पापे दूर करायला आला होता. तरीही येशूने पाण्याचा बाप्तिस्मा का घेतला?

येशूने पाण्याचा बापतिस्मा का घेतला याची दोन कारणे पवित्र शास्त्रात आपण पाहतो.

## हे एक कारण आहे

**योहान 1:29-34**

**29 दुसऱ्या दिवशी येशूला आपणाकडे येताना पाहून तो म्हणाला, "हा पाहा, जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा!**

**30 माझ्यामागून एक पुरुष येत आहे तो माझ्यापुढे झाला आहे, कारण 'तो माझ्यापूर्वी होता' असे ज्याच्याविषयी मी म्हणालो, तो हाच आहे.**

**31 मी त्याला ओळखत नव्हतो, तरी त्याने इस्राएलास प्रकट व्हावे म्हणून मी पाण्याने बाप्तिस्मा करत आलो आहे."**

**32 आणि योहानाने अशी साक्ष दिली की, "आत्मा कबुतरासारखा आकाशातून उतरत असताना आणि त्याच्यावर स्थिर राहिलेला मी पाहिला.**

**33 मी तर त्याला ओळखत नव्हतो; तरी ज्याने मला पाण्याने बाप्तिस्मा करण्यास पाठवले त्याने मला सांगितले होते की, 'ज्या कोणावर आत्मा उतरत असताना**

**व स्थिर राहताना पाहशील तोच पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा करणारा आहे.'**
**34 मी स्वतः पाहिले आहे व साक्ष दिली आहे की, हा देवाचा पुत्र आहे."**

बापतिस्मा करणारा योहान जगाचा तारणारा, मसीहाकडे संकेत करणार होता. परमेश्वराने योहानास अशी सूचना दिली होती की त्याने पाण्याचा बापतिस्मा द्यावा, केवळ पश्चातापाचे चिन्ह म्हणून नव्हे, तर यासाठी की याद्वारे देवाचा कोकरु इस्राएलावर आणि जगावर प्रगट होणार होता. त्याच्या आगमनाशिवाय आणि येशू पाण्यात बाप्तिस्मा घेत असतांना, आत्मा त्याच्यावर उतरणार होता आणि त्याच्यावर राहणार होता. हे योहानासाठी चिन्ह होते की *"तो हाच आहे."(योहान 1:33)* म्हणूनच, पाण्याने येशूचा बाप्तिस्मा करण्यात आला याचे हे प्रथम कारण आहे. देव पित्याने योहानाला हे चिन्ह म्हणून दिले होते, यासाठी की येशू ख्रिस्त देवाचा पुत्र आहे हे योहान दाखवू शकेल आणि घोषित करू शकेल.

हे योहानाच्या दृष्टिकोनातून होते.

येशूला पाण्यात बुडविण्याद्वारे बाप्तिस्मा देण्यात आला हे देखील सांगणे अद्भुत आहे. यार्देन नदीत येशूचा बाप्तिस्मा झाला आणि येशूला पाण्यात बुडविण्यात आले हे उघड आहे. हे मत्तयाच्या लिखाणावरून स्पष्टपणे दिसून येते: *"मग बाप्तिस्मा घेतल्यावर येशू लगेच पाण्यातून वर आला आणि पाहा, आकाश उघडले, तेव्हा त्याने परमेश्वराचा आत्मा कबुतरासारखा उतरताना व आपणावर येताना पाहिला"* (मत्तय 3:16).

## सर्व धर्माचरण पूर्ण करण्यासाठी

येशूच्या दृष्टीकोनातून या गोष्टी पाहणे देखील मनोरंजक आहे. येशू बाप्तिस्मा करणारा योहान याच्याद्वारे बाप्तिस्मा घेण्यासाठी का गेला? योहान पश्चात्तापाचा बाप्तिस्मा देत आहे हे येशूला पूर्णपणे माहीत होते आणि येशूजवळ स्वतः पश्चात्ताप करण्यासारखे काहीच नव्हते असे

असतांनाही येशू हे करावयास का प्रेरित झाला?

येशू यार्देन नदीत बाप्तिस्मा करणारा योहान याच्याजवळ आला तेव्हा हे घडले.

**मत्तय 3:13-17**

**[13] तेव्हा योहानाच्या हातून बाप्तिस्मा घेण्याकरता येशू गालीलाहून यार्देनेवर त्याच्याकडे आला.**

**[14] परंतु योहान त्याला मना करत म्हणाला, “आपल्या हातून मी बाप्तिस्मा घ्यावा, असे असता आपण माझ्याकडे येता हे काय?”**

**[15] येशूने त्याला उत्तर दिले, “आता हे होऊ दे; कारण ह्या प्रकारे सर्व धर्माचरण पूर्णपणे करणे हे आपणांला उचित आहे.” तेव्हा त्याने तसे होऊ दिले.**

**[16] मग बाप्तिस्मा घेतल्यावर येशू लगेच पाण्यातून वर आला आणि पाहा, आकाश उघडले, तेव्हा त्याने परमेश्वराचा आत्मा कबुतरासारखा उतरताना व आपणावर येताना पाहिला,**

**[17] आणि पाहा, आकाशातून अशी वाणी झाली की, “हा माझा ‘पुत्र’, मला ‘परमप्रिय आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे.”’**

असे दिसून येते की येशू पाण्याचा बाप्तिस्मा घेण्यासाठी येत असता बाप्तिस्मा करणारा योहान याला एक असामान्य अनुभव झाला. त्याला फक्त योहानाकडे येताना पाहून अचानक त्याला समजले की, “हा तोच आहे.” हे असामान्य होते. योहानाने अजून आत्म्यास कबुतरासारखे खाली उतरताना पाहिले नव्हते. स्वर्गातून अद्याप वाणीची गर्जना झाली नव्हती. आणि तरीही योहानाला हे माहित होते की हा बाप्तिस्मा घेणारा दुसरा एक मनुष्य नाही. हा देवाचा कोकरु होता, जो योहानाच्या सेवेचे संपूर्ण कारण होता. योहानाने जाणले की हाच तो आहे.

म्हणून, योहान येशूचा बाप्तिस्मा करण्यास तयार नव्हता. परंतु येशूने बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाला बाप्तिस्मा देण्याची विनंती केली, जेणेकरून ते *“सर्व धर्माचरण पूर्ण”*(मत्तय 3:15) करू शकतील, जे पित्याच्या दृष्टीने योग्य होते ते करू शकतील आणि त्या क्षणी जे केले

जावे असे पित्यास वाटत होते ते त्यांनी करावे.

बापतिस्म्यामध्ये असे काही होते जे पापापासून पश्चाताप करण्यापेक्षा अधिक “मोठे” होते. असे काही होते ज्यात देवाच्या निष्पाप पुत्राने, देवाच्या कोंकराने पाऊल टाकण्याची इच्छा धरली. ती देवाच्या इच्छेची अभिव्यक्ति होती जी पृथ्वीवर पाठवली जात होती. देवाच्या इच्छेस “होय” म्हणणारा, पृथ्वीवर प्रगट केल्या जाणाऱ्या देवाच्या राज्यास होय म्हणणारा प्रत्येक जण देवास त्यांच्या “होय”ची अभिव्यक्ति म्हणून पाण्याच्या बापतिस्म्यामध्ये पाऊल टाकणार होता.

जेव्हा आपण पाण्याचा बापतिस्मा घेता, तेव्हा आपण सर्व धर्माचरण पूर्ण करता. पित्याच्या दृष्टीत जे योग्य आहे ते आपण करता. आपण देवाची इच्छा पूर्ण करता. आपल्या जीवनात देवाची इच्छा पूर्ण करण्यास आणि तुमच्याद्वारे देवाचे राज्य पृथ्वीवर प्रगट करण्यास तुम्ही “होय” म्हणता.

परमेश्वर त्याच्या इच्छेचे पालन करणाऱ्यांस प्रतिफळ देतो. पाण्याच्या बापतिस्म्यामध्ये त्याच्या आज्ञेचे पालन करणे तुम्हास त्याचे प्रतिफळ प्राप्त करण्यास तयार करील. *“त्याचा शोध झटून करणाऱ्यांना तो प्रतिफळ देणारा आहे”* (इब्री 11:6).

## देवाच्या इच्छेचा नाकार करणे

जेव्हा बापतिस्मा करणारा योहान पश्चातापाच्या बापतिस्म्याचा संदेश प्रचार करीत आला, तेव्हा सर्वसामान्य लोकांनी आनंदाने त्याचा स्वीकार केला. तथापि, धार्मिक पुढारी, मुख्य याजक, परूशी, शास्त्री, आणि सदूकी लोकांनी योहान जो प्रचार करीत होता त्याचा स्वीकार करण्यास नाकार दिला.

म्हणून, येशूने जेव्हा धार्मिक पुढाऱ्यांस योहानाच्या बापतिस्म्याविषयी

प्रश्न केला, तेव्हा त्यांनी उत्तर देण्यास नाकार दिला, आणि फक्त म्हटले *"आम्हास माहीत नाही"(मार्क 11:33).*

**मार्क 11:30-33अ**
**30 योहानाचा बाप्तिस्मा स्वर्गापासून होता किंवा माणसांपासून होता ह्याचे मला उत्तर द्या."**
**31 तेव्हा ते आपसांत विचार करू लागले: 'स्वर्गापासून होता' असे म्हणावे तर तो म्हणेल की, 'तर मग तुम्ही त्याच्यावर विश्वास का ठेवला नाही?'**
**32 'माणसांपासून होता' असे म्हणावे तर? - त्यांना लोकांची भीती वाटत होती, कारण योहान खरोखरच संदेष्टा होता असे सर्व लोक मानत.**
**33अ तेव्हा त्यांनी येशूला उत्तर दिले, "आम्हांला ठाऊक नाही ...**

पण योहानाच्या संदेशास, जे पश्चातापास पाचारण होते आणि पश्चातापाचे चिन्ह म्हणून बापतिस्मा घेणे होते त्याचा नाकार करणे, देवाच्या इच्छेचा नाकार करणे होते.

**लूक 7:29,30**
**29 आणि जकातदारांसह सर्व लोकांनी त्याचे ऐकून देवाच्या नीतिमत्त्वाला मान्यता दिली, कारण त्यांनी योहानाचा बाप्तिस्मा घेतला होता.**
**30 परंतु परूशी व शास्त्री ह्यांनी आपणासंबंधाने असलेला देवाचा संकल्प व्यर्थ केला, कारण त्यांनी त्याच्यापासून बाप्तिस्मा घेतला नव्हता.**

आज जेव्हा आम्ही पश्चात्ताप करतो, येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवतो आणि बाप्तिस्मा घेतो तेव्हा आपण देवाची इच्छा पूर्ण करतो. आम्ही आमच्यासाठी देवाची इच्छा स्वीकारत आहोत. आम्ही सर्व धर्माचरण पूर्ण करीत आहोत, जे देवाच्या दृष्टीने योग्य ते करीत आहोत. आपण आपल्या जीवनात देवाची इच्छा पूर्ण करण्यास "होय" म्हणत आहोत. आम्ही आपल्याद्वारे पृथ्वीवर देवाचे राज्य मुक्त होण्यास "होय" म्हणत आहोत.

# मनन

1) येशू बाप्तिस्मा करणारा योहान याच्याद्वारे पाण्यात बाप्तिस्मा घेण्यासाठी का गेला?

2) या प्रकरणात तुम्ही जे शिकलात त्या आधारे तुम्ही पाण्यात बाप्तिस्मा घेता तेव्हा तुम्ही काय व्यक्त करता?

# 3
# तुम्ही त्याचे शिष्य आहा ही साक्ष

## शिष्य होण्यासाठी निमंत्रण

त्याच्या पृथ्वीवरील सेवाकार्यादरम्यान, येशूचे ऐकण्यासाठी आणि रोग बरे करवून घेण्यासाठी व त्यांच्या गरजेनुसार चमत्कार प्राप्त करण्यासाठी मोठी गर्दी लोटत असे. प्रभु येशूने लोकांना केवळ त्याचे ऐकण्याचे व चमत्कार प्राप्त करण्याचे आव्हान दिले नाही परंतु त्याने त्याचे शिष्य होण्याची निवड करण्याचे पाचारण त्यांस केले. त्याचा शिष्य होण्याचा काय अर्थ आहे आणि त्यासाठी काय किंमत मोजावी लागेल हे त्याने लोकांना शिकवले. हे सोपे होणार नव्हते, परंतु आमंत्रण खुले होते. कोणीही त्याचा शिष्य होण्याची निवड करू शकेल.

त्याचा शिष्य होण्याचा अर्थ काय आहे याविषयी जे काही बोलला त्यापैकी काही गोष्टी येथे आहेत:

1) सर्व शिष्यांचे ध्येय त्यांचा शिक्षक व गुरु येशू ख्रिस्त (मत्तय 10:25) याच्यासारखे व्हायचे होते.
2) शिष्यांनी त्यांच्या स्वामीप्रमाणे उपहास, खोटा आरोप, आणि छळ सहन करण्यास तयार असले पाहिजे (मत्तय 10:25).
3) शिष्य त्यांच्या गुरुंपेक्षा मोठे नव्हते (मत्तय 10:24), ज्याचा अर्थ शिष्यांस त्याच मार्गाने चालले पाहिजे ज्याने त्यांचा स्वामी चालला होता. शिष्यांकरिता कोणताही जवळचा मार्ग नाही.
4) जेव्हा शिष्यांस परिपूर्ण आणि संपूर्ण प्रशिक्षण दिले जाईल, तेव्हा ते त्यांच्या गुरुसारखे होतील (लूक 6:40).
5) शिष्य आपल्या स्वामीच्या शब्दांवर विश्वास धरतात आणि त्यानुसार

जगतात (योहान 8:31).

6) आपल्या स्वामीप्रीत्यर्थ शिष्यांच्या मनात जी प्रीती आहे ती इतर कुठल्याही जगीक नात्यासाठी असलेल्या प्रीतीपेक्षा श्रेष्ठ असली पाहिजे (लूक 14:26).

7) शिष्यांनी आपला वधस्तंभ दररोज घेऊन चालले पाहिजे (लूक 14:27). क्रूस क्लेश, विभक्तता, आणि त्यागाचे स्थान दर्शविते.

8) शिष्यांनी आपल्या स्वामीकरिता सर्वस्वाचा त्याग केला पाहिजे (लूक 14:33). याचा अर्थ स्वामीकरिता शिष्यांची प्रीती या जगातील इतर कोणत्याही गोष्टीसाठी असलेल्या प्रीतीपेक्षा किंवा स्नेहापेक्षा जास्त असली पाहिजे.

9) आपण आपल्या जीवनाद्वारे जी प्रीती दाखवू त्यावरून इतर लोक जाणतील की आपण येशूचे शिष्य आहोत (योहान 13:35).

10) *शिष्य खूप फळे* आणतील जेणेकरून त्यांच्या जीवनाद्वारे पित्याचे गौरव व्हावे (योहान 15:8).

11) शिष्य रोग बरे करण्याचे, चमत्काराचे, आणि मुक्तीचे कार्य करतील जसे येशूने केले (मत्तय 10:1; योहान 14:12).

## शिष्यांसाठी पाण्याचा बाप्तिस्मा

त्याच्या पृथ्वीवरील सेवेदरम्यान, येशूच्या शिष्यांनी अशा लोकांना बाप्तिस्मा दिला ज्यांनी येशू ख्रिस्ताच्या संदेशाचा व सेवेचा स्वीकार केला आणि येशूचे अनुसरण करावयास तयार होते. हा निर्णय घेणे सोपे नव्हते, कारण धार्मिक नेते लक्ष देत होते आणि येशू, त्याची शिकवण आणि सेवा याबद्दल त्यांच्या मनात राग होता. तरीसुद्धा लोक येशूकडे आले आणि त्याच्या शिष्यांनी त्यांचा पाण्यात बाप्तिस्मा केला.

**योहान 3:22**
**ह्यानंतर येशू आणि त्याचे शिष्य यहूदीया प्रांतात आले आणि तेथे त्यांच्याबरोबर**

**राहून तो बाप्तिस्मा करत होता.**

**योहान 4:1-3**

**1 येशू योहानापेक्षा अधिक शिष्य करून त्यांचा बाप्तिस्मा करत आहे हे परूश्यांच्या कानी गेले आहे असे जेव्हा प्रभूला कळले,**
**2 (तरी येशू स्वतः बाप्तिस्मा करत नसे, तर त्याचे शिष्य करत असत),**
**3 तेव्हा तो यहूदीया सोडून पुन्हा गालीलात गेला.**

अशाप्रकारे, येशूचे 12 प्रेषित (किंवा शिष्य) अशा लोकांस बापतिस्मा देण्याच्या प्रथेशी परिचित होते ज्यांनी येशूने प्रचार केलेला संदेश ग्रहण केलेला असे आणि त्याचे शिष्य म्हणून त्याचे अनुसरण करण्याची निवड केलेली असे. तसेच, कृपया हे लक्षात ठेवा की हा बुडवून पाण्याचा बापतिस्मा, ज्याचे बापतिस्मा करणारा योहान पालन करीत होता, आणि या शिष्यांनी तसेच येशूने स्वतः योहानाचा बापतिस्मा घेतला होता.

## पाण्याचा बापतिस्मा आणि महान आज्ञा

त्याच्या पुनरूत्थानानंतर, त्याच्या स्वर्गारोहणापूर्वी, प्रभू येशूने महान आज्ञा दिली ज्यास आपण सामान्यतः "महान आज्ञा" किंवा महान आदेश म्हणून उल्लेख करतो.

**मत्तय 28:19,20**

**19 तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा; त्यांना पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या;**
**20 जे काही मी तुम्हांला आज्ञापिले ते सर्व त्यांना पाळण्यास शिकवा; आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे. आमेन"**

महान आज्ञा प्रभूची आज्ञा आहे की त्यांनी जाऊन सर्व राष्ट्रांस शिष्य बनवावे. *"शिष्य बनविणे"* असे भाषांतर झालेला ग्रीक शब्द आहे *'मॅथेट्यूओ'* ज्याचा अर्थ आहे "विद्यार्थी बनणे," "शिक्षार्थी," "जो एखाद्याच्या शिकवणीचे अनुसरण करतो," जो आपल्या स्वामीसमान

बनण्यासाठी शिकण्यास, शिक्षा प्राप्त करण्यास, आणि स्वामीच्या वचनांचे प्रशिक्षण प्राप्त करण्यास तयार आहे. तो असा विचार दर्शवितो ज्याच्यासोबत प्रयत्न आहे. जसे आम्ही पूर्वी पाहिले आहे, शिष्य असा व्यक्ती आहे ज्याने येशूसमान बनण्याची आणि प्रभू येशूने आम्हास जी काही आज्ञा दिली आहे त्याचे पालन करण्याची निवड केली आहे. शिष्य बनविण्याच्या या आज्ञेत त्यांस (जे शिष्य बनण्याची निवड करतात) पाण्याचा बापतिस्मा देण्याची आज्ञा समाविष्ट आहे. आम्हाला त्यांस पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा यांच्या नावात बापतिस्मा द्यावयाचा आहे, अशाप्रकारे बायबलच्या देवासारखे बनावयाचे आहे.

**म्हणून पाण्याचा बापतिस्मा अशा सर्व लोकांसाठी साक्ष आहे, की तुम्ही येशू ख्रिस्ताचे शिष्य बनण्याची निवड केली आहे.** तुम्ही शिकण्याच्या, शिकविले जाण्याच्या, प्रशिक्षण प्राप्त करण्याच्या प्रवासावर जाण्याचा संकल्प केला आहे, जेणेकरून तुम्ही अधिकाधिक त्याच्यासमान होत जावे. तुम्ही निर्धार केला आहे की ते तुमचा उपहास, छळ करीत असले तरीही, तुम्हाला दुःख, त्याग इत्यादी करावा लागत असला तरीही तुम्ही या प्रक्रियेतून जावयास इच्छूक आहात. तुम्ही शिष्य म्हणून येशू ख्रिस्ताचे अनुसरण करावयाचा निर्णय घेतला आहे आणि आता माघार घेणे नाही.

## शिष्य शिष्यांस बापतिस्मा देतात

एक टिप्पणे म्हणून आम्ही सांगू इच्छितो की येशू ख्रिस्ताचा शिष्य बनण्याचा निर्णय घेतल्यानंतर आणि पाण्याचा बापतिस्मा घेतल्यानंतर, ती व्यक्ती इतरांस येशू ख्रिस्ताविषयी सांगू शकते, शिष्य बनवू शकते, आणि त्यांस पाण्याचा बापतिस्मा देऊ शकते. येशू ख्रिस्ताचे शिष्य बनण्याची जे निवड करतात त्यांस शिष्य बापतिस्मा देऊ शकतात. उदाहरणार्थ, फिलिप्पै हा यरूशलेम येथील मंडळीत मदत करणारा (डिकन) होता. त्याने जाऊन शमरोनात येशूविषयी सुवार्ता गाजविली

आणि त्याने शमरोनातील या नवीन विश्वासणाऱ्यांस बापतिस्मा दिला (प्रेषितांची कृत्ये 8:12). इथियोपियाच्या राणीचा वित्त अधिकारी असलेल्या इथियोपियन माणसाला देखील फिलिप्पाने बापतिस्मा दिला (प्रेषितांची कृत्ये 8:37,38).

शौलाला, जो नंतर प्रेषित पौल झाला, दमिश्कातील हनन्या नावाच्या शिष्याने बापतिस्मा दिला (प्रेषितांची कृत्ये 9:10,18).

## मनन

1) या प्रकरणात येशू ख्रिस्ताचा शिष्य होण्याचा अर्थ काय आहे यावर दिलेल्या 11 वाक्यांचा आढावा घ्या. आपल्या जीवनात वैय्यक्तिकरित्या त्यांचा काय अर्थ आहे यावर मनन करा.

2) येशू ख्रिस्तामध्ये विश्वास ठेवण्याची आणि शिष्य म्हणून त्याचे अनुसरण करण्याची आपण वैयक्तिक निवड करता का?

# 4
# येशू ख्रिस्तामधील तुमच्या विश्वासाची साक्ष

प्रभू येशूच्या स्वर्गारोहणानंतर 120 शिष्यांनी पेंटेकॉस्टच्या दिवशी पवित्र आत्म्याचे सामर्थ्य प्राप्त केले ज्याच्याविषयी प्रेषितांची कृत्ये 2 मध्ये लिहिले आहे. त्यांनी यरूशलेमापासून सुरूवात करून नंतर इतर शहरांपर्यंत लोकांस येशू ख्रिस्ताची सुवार्ता सांगावयास सुरूवात केली.

## येशू ख्रिस्ताची सुवार्ता

येशू ख्रिस्ताची सुवार्ता ही आहे की येशू हा जगास पापापासून आणि त्याच्या परिणामांपासून तारावयास आला. येशू ख्रिस्त आमच्या पापांची शिक्षा स्वतःवर घेऊन आमच्या जागी मरावयास आला. त्याने पाप, सैतान, रोग, यांचे सामर्थ्य मोडले, आम्हास अंधकाराच्या बंधनातून स्वतंत्र केले आणि तारणाचे विनामूल्य कृपादान आम्हास दिले. तो वधस्तंभावर मेला, गाडल्या गेला, तिसऱ्या दिवशी पुन्हा जीवंत झाला, आणि त्याने आपल्या स्वर्गारोहणापूर्वी 500 प्रत्यक्ष साक्षींना स्वतःस जीवंत दाखविले. पश्चाताप करणाऱ्या व त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस येशू ख्रिस्त देत असलेल्या तारणाचे विनामूल्य कृपादान कोणीही ग्रहण करू शकतो. जेव्हा आपण येशूला आपला प्रभू आणि तारणारा म्हणून स्वीकार करतो, तेव्हा आपला नव्याने जन्म होतो, आपण देवाची मुले बनतो, आम्हास अंधाराच्या राज्यातून काढून त्याच्या गौरवाच्या राज्यात आणले जाते, आणखी बरेच काही घडते. ही सुवार्ता आहे! धर्म हे आमच्यासाठी करू शकत नाही. आम्ही स्वतःच्या भक्तिमानतेद्वारे, सत्कृत्यांनी, धार्मिक प्रयत्नांनी हे प्राप्त करू शकत

नाही. हे विनामूल्य कृपादान आहे ज्याचा आपण विश्वासाने स्वीकार करू शकतो.

## जर तू येशू ख्रिस्तामध्ये विश्वास ठेवितोस, तर ये आणि बापतिस्मा घे

आपण पाहतो की प्रेषितांच्या कृत्यांच्या पुस्तकात आमच्यासाठी जे काही निवडले आहे ते हे आहे की जेव्हा येशू ख्रिस्ताची सुवार्ता गाजविण्यात आली, तेव्हा लोकांस येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्यासाठी निमंत्रण देण्यात आले. आणि मग, ज्या सर्व लोकांनी येशूवर विश्वास ठेवला त्या सर्वांना पाण्याचा बापतिस्मा घेण्याद्वारे येशू ख्रिस्ताठायी त्यांच्या विश्वासाचा अंगीकार करण्यास (सार्वजनिक घोषणा करणे, सार्वजनिक साक्ष) निमंत्रण देण्यात आले.

प्रेषितांच्या कृत्यांच्या पुस्तकात येथे काही उदाहरणे दिलेली आहेत जेव्हा लोकांनी बापतिस्मा घेतला.

- पेंटेकॉस्टच्या दिवशी विश्वासणारे (प्रेषितांची कृत्ये 2:38-41),
- शमरोन नगरात विश्वासणारे (प्रेषितांची कृत्ये 8:12,13),
- शाऊल (जो नंतर पौल बनला) (प्रेषितांची कृत्ये 9:17,18; प्रेषितांची कृत्ये 22:16),
- कर्नेलियसचे घराणे (प्रेषितांची कृत्ये 10:47,48),
- फिलिप्पै येथील विश्वासणारे (प्रेषितांची कृत्ये 16:14,15,31-34),
- करिंथ येथील विश्वासणारे (प्रेषितांची कृत्ये 18:7,8),
- इफिस येथील विश्वासणारे (प्रेषितांची कृत्ये 19:1-5).

## जाहीर अंगीकार

प्रारंभिक मंडळीतील या लोकांपैकी अनेकांसाठी, पाण्याचा बापतिस्मा

घेण्याचा निर्णय सोपा नव्हता. त्यांच्यापैकी अनेकांचा येशू ख्रिस्तावरील विश्वासासाठी छळ करण्यात येत होता. पण त्यांनी धैर्याने विश्वासाचा पक्ष घेतला, हे जाणून की ते कोणामध्ये विश्वास ठेवतात.

प्रभू येशूने अभिवचन दिले होते की जर आपण येथे पृथ्वीवर लोकांसमोर त्यास कबूल करू, तर तो पित्यासमोर हे कबूल किंवा मान्य करील की आपण त्याचे स्वतःचे लोक आहोत!

**मत्तय 10:32,33**

**32 जो कोणी माणसांसमोर मला पत्करील त्याला मीही आपल्या स्वर्गातील पित्यासमोर पत्करीन;**

**33 पण जो कोणी माणसांसमोर मला नाकारील त्याला मीही आपल्या स्वर्गातील पित्यासमोर नाकारीन.**

पाण्याचा बापतिस्मा आपल्या जीवनाचा तारणारा व प्रभू म्हणून येशू ख्रिस्तावरील आपल्या विश्वासाचा जाहीर अंगीकार आहे. आपण लोकांपुढे हे मान्य करता, त्यांस साक्ष देता, आणि त्यांच्यापुढे जाहीर करता की तुम्ही तुम्हास पापांपासून वाचविण्यासाठी येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला आहे आणि तारणाचे त्याचे विनामूल्य कृपादान प्राप्त केले आहे.

## प्रभू येशूच्या नावात बापतिस्मा

एक टिप्पणे म्हणून, आम्ही हे दाखवितो की प्रेषितांच्या कृत्यांच्या पुस्तकात लिहिल्याप्रमाणे, लोकांचा बापतिस्मा प्रभू येशूच्या नावात करण्यात आला.

येथे काही संदर्भ दिलेले आहेत:

**प्रेषितांची कृत्ये 2:38**

**पेत्र त्यांना म्हणाला, “पश्चाताप करा व तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्याय म्हणजे तुम्हांला पवित्र**

**आत्म्याचे दान प्राप्त होईल.**

**प्रेषितांची कृत्ये 8:16**
**कारण तोपर्यंत त्यांच्यापैकी कोणावरही तो उतरला नव्हता. प्रभू येशूच्या नावात त्यांचा बाप्तिस्मा मात्र झाला होता.**

**प्रेषितांची कृत्ये 10:48**
**मग 'प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात त्यांचा बाप्तिस्मा व्हावा' अशी त्याने आज्ञा केली. तेव्हा काही दिवस राहावे म्हणून त्यांनी त्याला विनंती केली.**

**प्रेषितांची कृत्ये 19:5**
**हे ऐकून त्यांनी प्रभू येशूच्या नावाने बाप्तिस्मा घेतला.**

जेव्हा आपण प्रभु येशू ख्रिस्ताच्या नावात बापतिस्मा घेता, तेव्हा याचा अर्थ हा की आपण त्याच्याशी एक होत आहा. आपण सार्वजनिकरित्या त्याच्याशी आपली ओळख दाखवीत आहा. याचे देखील आध्यात्मिक महत्व आहे, जे आपण पुढील प्रकरणात समजाविणार आहोत.

"येशूच्या नावात" हा शब्द देखील हे दर्शवितो की कोणाच्या अधिकाराने आणि कोणाचे प्रतिनिधी म्हणून आपण हे करीत आहोत. म्हणून, जेव्हा कोणी "येशूच्या नावात" बापतिस्मा देतो, तेव्हा त्याचा अर्थ हा आहे की येशू ख्रिस्ताने आम्हाला दिलेल्या महान आज्ञेद्वारे (मागील अध्याय पहा) जो अधिकार दिला आहे, त्या अधिकाराने आम्ही नवीन शिष्यास हा पाण्याचा बापतिस्मा देत आहोत. आम्ही त्याच्या नावाने, त्याच्या वतीने, त्याचे प्रतिनिधी म्हणून, पूर्ण अधिकार प्राप्त करून, आणि त्याच्याद्वारे सामर्थ्य प्राप्त करून असे करीत आहोत.

म्हणून, जेव्हा आपण लोकांस बापतिस्मा देतो तेव्हा आपण म्हणतो: "येशूच्या नावात, मी पिता, पुत्र, आणि पवित्र आत्म्याच्या नावात तुला बापतिस्मा देतो." याचा अर्थ हा की आपण येशू ख्रिस्ताने आम्हाला

दिलेल्या अधिकारानिशी हे करीत आहोत, आणि आपण या व्यक्तीस बापतिस्मा देत आहोत, जो येशू ख्रिस्ताद्वारे बायबलच्या परमेश्वराशी ओळख प्राप्त करीत आहे.

## मनन

1) आपणास येशू ख्रिस्ताची सुवार्ता समजली आहे काय आणि आपण त्यावर पूर्णपणे विश्वास ठेवता काय?
2) आपण येशू ख्रिस्तास आपला तारणारा आणि प्रभू म्हणून सार्वजनिकरित्या कबूल करावयास तयार आहात काय?

# 5
# येशूसोबत आपल्या समानतेची साक्ष

प्रभू येशू ख्रिस्ताने मंडळीत तीन विधी स्थापन केले आहेत: पाण्याचा बापतिस्मा आणि प्रभूभोजन. येशू ख्रिस्ताने आपला मृत्यू आणि पुनरूत्थान याद्वारे जे काही साध्य केले ते घोषित करण्याचे दोन्ही सामर्थ्यवान मार्ग आहेत. प्रभूने सांगितल्याप्रमाणे प्रेषित पौलाने 1 करिंथ 11:26 मध्ये लिहिले *आहे "कारण जितक्यांदा तुम्ही ही भाकर खाता व हा प्याला पिता तितक्यांदा तुम्ही प्रभूच्या मरणाची तो येईपर्यंत घोषणा करता."* म्हणून जेव्हा आपण प्रभुभोजनात सहभागी होतो तेव्हा आपण वधस्तंभावर येशू ख्रिस्ताने पूर्ण केलेल्या कार्यावरील आमच्या विश्वासाची आणि त्याच्या लवकरच परत येण्याची घोषणा करतो, जाहीर करतो.

त्याचप्रमाणे, पाण्याचा बापतिस्मा येशूसोबत आमच्या ओळखीची घोषणा आहे. येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर आमच्यासाठी जे काही केले त्यामुळे आमच्यासोबत जे काही घडले त्याची आम्ही दृश्य आणि अदृश्य जगांस घोषणा करीत आहोत. ही आमच्यात एक आत्मिक सत्यता आहे. असे आमच्यासोबत आधीच घडले आहे. **पाण्याचा बापतिस्मा आत्म्यामध्ये आमच्यासाठी जे काही आधीच घडले आहे त्याची प्रतीकात्मक अभिव्यक्ती आणि सामर्थ्यपूर्ण घोषणा आहे.**

प्रेषित पौल येथे सांगतो:

**रोमकरांस पत्र 6:3,4**

**3 किंवा आपण जितक्यांनी ख्रिस्त येशूमध्ये बाप्तिस्मा घेतला तितक्यांनी त्याच्या मरणात बाप्तिस्मा घेतला, ह्याविषयी तुम्ही अजाण आहात काय?**

**[4] तर मग आपण त्या मरणातील बाप्तिस्म्याने त्याच्याबरोबर पुरले गेलो; ह्यासाठी की, ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवाने मेलेल्यांतून उठला त्याचप्रमाणे आपणही नवीन प्रकारच्या जीवनात चालावे.**

**कलस्सै 2:12**
**तुमचा बाप्तिस्मा झाला तेव्हा तुम्ही त्याच्याबरोबर पुरले गेलात, आणि ज्याने त्याला मेलेल्यांतून उठवले त्या देवाच्या कृतीवरील विश्वासाच्या द्वारे त्याच्याबरोबर उठवलेही गेलात.**

जेव्हा आमचा नवा जन्म झाला तेव्हा परमेश्वर आम्हास ख्रिस्तामध्ये घेऊन आला (1 करिंथ 1:30). आम्ही त्याच्याठायी आहोत, आत्मिकरित्या त्याच्यासोबत एक आहोत (1 करिंथ 6:17). पवित्र आत्म्याने आम्हास ख्रिस्तामध्ये ठेविले (1 करिंथ 12:13). आत्मिकरित्या आम्ही आधीच ख्रिस्ताठायी आहोत. इतकेच नव्हे तर, आम्ही त्याच्याठायी "आहोत" म्हणून आमचे त्याच्या मृत्यूशी (वधस्तंभारोहण), पुरले जाण्याशी, पुनरूत्थानाशी, स्वर्गारोहणाशी, आणि स्वर्गात विराजमान होण्याशी साम्य आहे. यास तादात्म्य म्हटले जाते.

- **त्याच्या मृत्यूशी (वधस्तंभारोहण) साम्य:** जेव्हा ख्रिस्त मरण पावला, तेव्हा आम्ही त्याच्यासोबत मरण पावलो. जुना पापमय स्वभाव, *"जुना मनुष्य त्याच्यासोबत वधस्तंभावर खिळला गेला"* (रोमकरांस पत्र 6:6). आता आमच्याठायी जुना पापमय स्वभाव नाही. आता *आपण ईश्वरीय स्वभावात सहभागी आहोत* (2 पेत्र 1:4). आमच्या जीवनावरील पापाचे सामर्थ्य तोडल्या गेले आहे आणि आता आपण पापाचे गुलाम नाही (रोमकरांस पत्र 6:14).
- **त्याच्या पुरल्या जाण्यात साम्य:** जेव्हा ख्रिस्तास पुरल्या गेले, तेव्हा आम्ही पुरल्या गेलो. याचा अर्थ आम्हास जुन्या जीवनापासून वेगळे करण्यात आले. जुने गेले आहे. नवे आले आहे. आता आपण नवीन उत्पत्ती आहोत आणि जुन्याचा आता आमच्यावर दावा नाही किंवा त्याला आमच्यात भाग नाही (2 करिंथ 5:17).

- **त्याच्या पुनरूत्थानाशी साम्य:** जेव्हा ख्रिस्त मरणातून जिवंत झाला, तेव्हा आम्ही त्याच्यासोबत जिवंत झालो (इफिसकरांस पत्र 2:5). याचा अर्थ हा की आम्हास मरणातून जीवनात आणण्यात आले, सैतानाच्या सामर्थ्यातून देवाच्या सामर्थ्याप्रत आणण्यात आले (कलस्सै 1:13). आता आपण देवाच्या राज्यात नवीन जीवनात चालत आहोत. आमच्या जगण्याची पद्धत नवी आहे. अंधःकाराचे सामर्थ्य आम्हास धरून ठेवू शकत नाही.
- **त्याच्या स्वर्गारोहणाशी साम्य:** जेव्हा ख्रिस्त स्वर्गास चढून गेला, तेव्हा आम्ही त्याच्यासोबत स्वर्गास गेलो (इफिसकरांस पत्र 2:6; कलस्सै 3:1-3). म्हणून आम्ही आपले लक्ष स्वर्गीय गोष्टींकडे लावतो. आम्ही नवीकृत मनासोबत जगतो जेथे आपण स्वर्गाच्या दृष्टीकोनातून जीवनाकडे पाहतो. आमचे जीवन देवामध्ये ख्रिस्तासोबत लपलेले आहे.
- **त्याच्या स्वर्गात विराजमान होण्याशी साम्य:** जेव्हा ख्रिस्त पित्याच्या उजव्या बाजूस सिंहासनावर जाऊन बसला, तेव्हा आम्हास त्याच्यासोबत बसविण्यात आले (इफिसकरांस पत्र 2:6). तुम्ही ख्रिस्तामध्ये अधिकार आणि प्रभुत्वाच्या स्थानी विराजमान आहात आणि सैतान व त्याचे सर्व दुरात्मा सैन्य आमच्या पायाखाली आहेत.

पाण्याचा बापतिस्मा या सर्व गोष्टींची अभिव्यक्ती आहे. जेव्हा तुम्ही पाण्याखाली जाता (बुडविले जाता) जाता, तेव्हा ते येशू ख्रिस्तासोबत तुमच्या मृत्यूचे (वधस्तंभारोहणाचे) आणि पुरले जाण्याचे प्रतीक आहे. जेव्हा तुम्ही पाण्यातून बाहेर पडता, ते पुनरूत्थानाचे, स्वर्गारोहणाचे, आणि येशू ख्रिस्तासोबत स्वर्गीय स्थानी विराजमान होण्याचे प्रतीक आहे.

**जेव्हा तुमचा पाण्याने बापतिस्मा होतो, तेव्हा तुम्ही दृश्य आणि अदृश्य जगांस ही घोषणा करीत आहा की तुम्ही आत्मिकरित्या येशू**

**ख्रिस्तासोबत त्याचा मृत्यू, पुरले जाणे, पुनरूत्थान, स्वर्गारोहण व स्वर्गीय स्थानी विराजमान झाले आहात. ही प्रतीकात्मक क्रिया आहे आणि अतिशय सामर्थ्यवान आहे. पाण्याच्या बापतिस्म्याच्या क्षणी, आपण अपेक्षा करू शकता की वधस्तंभाचे सामर्थ्य पवित्र आत्म्याच्या कार्याद्वारे तुम्हास दिले जाऊ शकते.** जर मागील जीवनाचे असे काही असेल (पाप, व्यसन, लज्जा, आघात, इ.) जे आपणास टोचून बोलत असेल आणि आपणास धरून राहण्याची धमकी देत असेल, तर दैहिक रूपात त्याजपुढे ही घोषणा करा की तुमच्यावरील त्याचे सामर्थ्य मोडकळीस आले आहे. अपेक्षा करा की पाण्याच्या बापतिस्म्यातील आपली घोषणा संपूर्ण जुने जीवन आणि जे काही त्याच्याशी निगडीत असेल ते सर्व मोडून काढील.

प्रेषित पौलाने म्हटले आहे की आम्ही "ख्रिस्तास परिधान केले" आहे.

**गलती 3:27**
**कारण तुमच्यामधील जितक्यांचा ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा झाला आहे तितक्यांनी ख्रिस्ताला परिधान केले आहे.**

आम्ही ख्रिस्तामध्ये इतके एक आहोत की जेव्हा लोक आम्हास पाहतात, तेव्हा त्यांनी येशूला पाहावे. आम्ही त्यास धारण केले पाहिजे. पवित्र आत्मा आम्हास दररोज त्याच्या प्रतिरूपात घडवीत जातो, यासाठी की हळूहळू लोक आमच्यामध्ये ख्रिस्तास पाहतील कारण आपण ख्रिस्ताला धारण केले आहे.

## मनन

आपण येशू ख्रिस्ताचा

1) त्याचा मृत्यू (वधस्तंभावर) (रोमकरांस पत्र 6:6),

2) २) त्याचे दफन (रोमकरांस पत्र 6:4),

3) त्याचे पुनरुत्थान (इफिसकरांस पत्र 2:5),

4) त्याचे स्वर्गारोहण (इफिसकरांस पत्र 2:6) आणि

5) त्याचे देवाच्या उजव्या हातास बसणे (इफिसकरांस पत्र 2:6).

या अध्यायात जे काही सांगण्यात आले आहे त्या आधारे, मनन करा की या पाच पैलूंपैकी प्रत्येकाचा आपल्यासाठी वैयक्तिकरित्या काय अर्थ आहे.

# 6
# उत्तम विवेकबुद्धीचा प्रतिसाद

प्रेषित पेत्र नोहाच्या जहाजाचा उल्लेख करतो ज्यात आठ लोकांचा जलप्रलयापासून बचाव झाला. त्यानंतर तो पाण्याच्या बापतिस्म्याकडे निर्देश करतो जे याचे प्रतीक आहे की आपणासही येशू ख्रिस्तावरील विश्वासाद्वारे तारण लाभले आहे जो मरणातून जिवंत झाला आणि स्वर्गात उच्च स्थानी विराजमान आहे

**1 पेत्र 3:20-22**

**20 हे आत्मे म्हणजे पूर्वी नोहाच्या दिवसांत तारू तयार होत असता देव सहन करत वाट पाहत होता त्या वेळी ज्यांनी त्याची आज्ञा अवमानली तेच ते होत. त्या तारवात केवळ आठ जण पाण्यातून वाचवण्यात आले.**

**21 त्याच्या लाक्षणिक अर्थाने आता 'बाप्तिस्मा' येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या द्वारे तुमचे तारण करत आहे. त्याचा अर्थ केवळ देहाचा मळ धुऊन टाकणे नव्हे, तर शुद्ध भावाने देवाचे ऐकणे, असा आहे.**

**22 तो येशू ख्रिस्त स्वर्गात गेला आणि आता 'देवाच्या उजवीकडे' आहे, त्याच्या स्वाधीन देवदूत, अधिकारी व सत्ताधीश हे ठेवले आहेत.**

पाण्याच्या बापतिस्म्याचा उल्लेख करीत असतांना, पेत्र हे दाखवितो की बापतिस्मा हा पाण्याने बाहेरून स्नान करणे नाही ज्यामुळे त्वचेचा मळ दूर होतो, पण या गोष्टीचा उल्लेख आहे की आमचा विवेक आता शुद्ध करण्यात आला आहे (धुण्यात आला आहे) आणि परमेश्वराप्रत चांगला आहे. अर्थात हे प्रभू येशू ख्रिस्ताच्या मरणात व पुनरूत्थानात विश्वासाद्वारे घडले आहे.

जेव्हा आपण प्रभू येशू ख्रिस्तामध्ये विश्वास ठेवला, तेव्हा त्याच्या रक्ताने आमची पापे धुऊन टाकली आणि धूत आहे. आपण ख्रिस्ताठायी, देवाचे नीतिमत्व ठरलो आहोत. आम्ही त्याच्या दृष्टीने

शुद्ध, त्याच्या सान्निध्यात स्वीकारलेले, आणि परमेश्वराचे प्रिय आहोत. आमचा विवेक उत्तम आणि परमेश्वराप्रत शुद्ध आहे. आमच्यात दोष, लज्जा, आरोप, किंवा अपराधबोधाची भावना नाही जी आपणास परमेश्वराशी संवाद साधण्याच्या मार्गात अडखळण आणते. केवळ येशू ख्रिस्त आम्हास परमेश्वरासोबत अशा नात्यात आणू शकतो. **आता पाण्यात आपला बापतिस्मा झाला आहे कारण आपला विवेक येशू ख्रिस्ताद्वारे परमेश्वराप्रत शुद्ध आणि स्वच्छ झालेला आहे. पाण्याचा बापतिस्मा हा अशा व्यक्तीचे उत्तर किंवा प्रतिसाद आहे ज्याची विवेकबुद्धी परमेश्वराप्रत उत्तम आहे.**

आमच्यासाठी परमेश्वराने पूर्ण केलेल्या कामात विश्वासाद्वारे आणि रोजच्या जीवनात त्याच्या आज्ञेचे पालन करण्याद्वारे आम्ही परमेश्वरासमक्ष शुद्ध विवेक राखतो.

**1 योहान 3:20-22**

**20 त्याविषयी आपण स्वतःच्या मनाला त्याच्यासमोर उमेद देऊ; कारण आपल्या मनापेक्षा देव थोर आहे; त्याला सर्वकाही कळते.**

**21 प्रियजनहो, आपले मन आपल्याला दोषी ठरवत नसेल, तर देवासमोर येण्यास आपल्याला धैर्य आहे.**

**22 आणि आपण जे काही मागतो ते त्याच्यापासून आपल्याला मिळते, कारण आपण त्याच्या आज्ञा पाळतो व त्याला जे आवडते ते करतो.**

जेव्हा आपला विवेक स्पष्ट असतो तेव्हा आपले अंतःकरण आपल्याला दोषी ठरवीत असेल, आणि आपणास परमेश्वरासमोर विश्वास आहे. जर आपले अंतःकरण आपल्याला दोषी ठरवित असेल, म्हणजे जर आपला विवेक स्पष्ट नसेल, तर आपणास आतून काहीतरी “दोष देत” असते. देवाला सर्व काही माहित आहे, म्हणून 1 योहान 1:9 मधील सूचनेनुसार, आम्हाला ज्ञात आणि अज्ञात पापांबद्दल कबूली करण्याची, त्यांचा अंगीकार करण्याची आणि त्याच्या रक्ताद्वारे शुद्धता मागण्याची गरज आहे. त्यानंतर आम्ही ख्रिस्तावर विश्वास ठेवून शुद्ध, स्पष्ट आणि

उत्तम विवेकबुद्धीसह भावासह परमेश्वरासमक्ष चालत आहोत. आपण त्याच्या आज्ञेत राहतो आणि जे त्याच्या दृष्टीने प्रसन्नतादायक आहे ते करीत राहतो. आपण परमेश्वरासमोर शुद्ध भाव राखतो.

## मनन

1) या अध्यायात चर्चा केल्याप्रमाणे परमेश्वराप्रत “शुद्ध भाव” राखण्याचा अर्थ काय आहे?

2) पाण्याच्या बापतिस्म्यानंतरही आपल्या रोजच्या जीवनांत तुम्ही परमेश्वराप्रत शुद्ध भाव कसा राखता?

# 7
# काही सर्वसामान्य प्रश्नांची उत्तरे

या प्रकरणात, आम्ही काही सामान्य प्रश्नांच्या उत्तरांच्या रूपात संक्षिप्त कथन देत आहोत. या उत्तरांसाठी ईश्वरविज्ञान आणि पवित्र शास्त्राच्या आधारास मागील अध्यायांत संबोधित करण्यात आले आहे. म्हणून, त्याची येथे पुनरावृत्ती करण्यात आलेली नाही.

## 1) बापतिस्मा घेण्याचे योग्य वय काय आहे?

व्यक्तीचा बापतिस्मा कोणत्या वयात व्हावा हे पवित्र शास्त्रात ठरविण्यात आलेले नाही. म्हणून, पवित्र शास्त्रात आम्हास देण्यात आलेल्या पूर्वपात्रतेसोबत आपण गेले पाहिजे, बापतिस्मा घेण्यासाठी या पात्रतेनुसार व्यक्तीने पश्चाताप केला असावा आणि तारणारा व प्रभू म्हणून त्याने येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला असावा. शिशू असे करू शकत नाही, आणि म्हणून शिशूचा बापतिस्मा पवित्र शास्त्रात ठरविलेला नाही. परंतु, कोणत्याही वयाचा व्यक्ती जेव्हा येशू ख्रिस्ताचा संदेश आणि सुवार्तेचा अर्थ समजू शकतो आणि पश्चाताप करून व्यक्तिगतरित्या येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवतो, तो पाण्याचा बापतिस्मा घेण्यासाठी तयार आहे.

## 2) तारण प्राप्त केल्यानंतर विश्वासणाऱ्याने केव्हा बापतिस्मा घ्यावा याविषयी प्रतीक्षेचा काळ आहे का?

वाट पाहण्याची अथवा प्रतीक्षेची गरज नाही. आमच्यासाठी प्रेषितांच्या कृत्यांच्या पुस्तकात लिहिण्यात आलेल्या सर्व उदाहरणांत आपण पाहतो की लोकांनी जेव्हा पश्चाताप करण्यासाठी समर्पण केले आणि

येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला तेव्हा लगेच त्यांनी पाण्याचा बापतिस्मा घेतला. तथापि, लोकांना पाण्याच्या बापतिस्म्याचा अर्थ समजण्यात मदत करण्यासाठी आणि त्यांच्या स्वतःच्या स्वतंत्र इच्छेद्वारे ते करण्यासाठी पाण्याच्या बापतिस्म्याचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी वेळ देणे चांगले आहे आणि कुठल्याही प्रकारची बळजबरी न करता पाण्याचा बापतिस्मा घेण्याचा त्यांनी स्वतः निर्णय घ्यावा यासाठी त्यांस वेळ द्यावा.

## 3) आपण कोणते "बापतिस्मा सूत्र" उपयोगात आणतो?

प्रभू येशूने आम्हास दिलेल्या महान आज्ञेच्या आधारे आणि प्रेषितांच्या कृत्यांच्या पुस्तकात जसे केले जात असे त्या आधारे, आपण या वाक्याचा उपयोग करतो: "येशूच्या नावात, मी तुला पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याच्या नावात बापतिस्मा देतो."

## 4) दुसऱ्या विश्वासणाऱ्यांस बापतिस्मा देण्याचा अधिकार कोणाला आहे?

स्वतः ज्याने पाण्याचा बापतिस्मा घेतला आहे तो अशा दुसऱ्या व्यक्तीला पाण्याचा बापतिस्मा देऊ शकतो, ज्याने येशूच्या मागे चालण्याचा निर्णय घेतला आहे.

## 5) मला पुन्हा बापतिस्मा घेण्याची गरज आहे का?

शिशूवर पाणी शिंपडणे ही पाण्याचा बापतिस्मा देण्याची बायबलची पद्धत नाही, यास पाण्याचा बापतिस्मा समजता येत नाही. म्हणून ज्या व्यक्तीवर बालपणी पाणी शिंपडण्यात आले, त्याला येशू ख्रिस्तास आपला तारणारा व प्रभू म्हणून ग्रहण केल्यानंतर पाण्याचा बापतिस्मा घेण्याची गरज आहे.

काही लोकांस, कदाचित त्यांचे आईवडील किंवा मित्र पाण्याचा बापतिस्मा घेण्यास प्रोत्साहन देतात आणि त्यांनी येशू ख्रिस्ताठायी

विश्वासाने तारणाचा अनुभव न घेता एक विधी म्हणून तसे केले. अशावेळी, आम्ही लोकांस प्रोत्साहन देतो की येशूवर विश्वास केल्यानंतर त्यांनी पाण्याचा बापतिस्मा घ्यावा.

काही ठिकाणी, लोक आपल्या विश्वासापासून भटकले आहेत आणि देवापासून दूर गेले आहेत आणि त्यांना आपल्या अंतःकरणात याची जाणीव होते आणि प्रभूकडे परत येण्याचे चिन्ह म्हणून ते पुन्हा बापतिस्मा घेण्याची इच्छा धरतात. त्यांच्या व्यक्तिगत निवडीनुसार असे करण्यासाठी त्यांचे स्वागत आहे.

## 6) पाण्याचा बापतिस्मा तारणासाठी जरूरी आहे का किंवा ती तारणाची अभिव्यक्ती आहे का?

तारण हे पूर्णपणे ख्रिस्तामध्ये विश्वासाद्वारे कृपेने आहे. पाण्याचा बापतिस्मा हा तारण प्राप्त केल्याची अभिव्यक्ती आहे. जरी त्याच्या पृथ्वीवरील सेवेत येशूने त्या लोकांस बापतिस्मा दिला ज्यांनी येशूचे अनुसरण करण्याची निवड केली, तरीही वधस्तंभावर चोरास येशूने सुखलोकप्राप्तीचे अभिवचन दिले, ज्याद्वारे त्यास तारण प्राप्त झाले. वधस्तंभावर चोराजवळ बापतिस्मा घेण्याचा पर्याय नव्हता. तसेच, असे अनेक लोक असतील जे पृथ्वीवरील त्यांच्या अंतिम क्षणी येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेऊ शकतात आणि त्यांना बापतिस्मा घेण्याची संधी नसू शकते. ख्रिस्तामध्ये विश्वासाने त्यांस तारण प्राप्त होते. आमच्यापैकी ज्यांनी तारण प्राप्त केले आहे, त्यांच्यासाठी पाण्याचा बापतिस्मा ही आज्ञपालनाची बाब आहे जी आपण लगेच पूर्ण केली पाहिजे.

## 7) आपण मृतांसाठी बापतिस्मा घेऊ शकतो का?

काही लोक हा प्रश्न विचारण्यासाठी की जे आधीच मेलेले आहेत त्यांच्या वतीने त्यांचे “प्रतिनिधी” म्हणून आपण बापतिस्मा घेऊ शकतो का,

1 करिंथ 15:29 चा संदर्भ देतात:

**1 करिंथ 15:29**
**असे नसल्यास मेलेल्यांखातर जे बाप्तिस्मा घेतात ते काय करतील? जर मेलेले मुळीच उठवले जात नाहीत तर त्यांच्याखातर ते बाप्तिस्मा का घेतात?**

1 करिंथ 15 मध्ये, प्रेषित पौल हे सत्य मांडत आहे की कबरेपलीकडे जीवन आणि मेलेल्यांतून पुनरूत्थान आहे. असे करीत असतांना तो एक वाक्य मांडत आहे जे “ते”चा उल्लेख करते जे मेलेल्यांखातर बापतिस्मा घेतात. हे “ते” असे लोक आहेत जे अर्थातच ख्रिस्ती विश्वासात नव्हते, पण असे लोक ज्याचा अंधश्रद्धाळू विश्वास होता की कुठल्यातरी बापतिस्म्यासारख्या प्रथेचे पालन केल्याने ते त्यांच्या मृतांच्या मरणानंतरच्या जीवनास प्रभावित करू शकतात. तो त्यांच्या प्रथेचे समर्थन करीत नाही, पण फक्त हे दाखविण्यासाठी त्यांच्या प्रथेकडे अंगुलीनिर्देश करतो की तेसुद्धा मरणानंतरच्या जीवनावर विश्वास ठेवतात. नवीन करारात असे कोणतेही वचन नाही जे कोणत्याही प्रकारे मृतांचा बापतिस्मा दाखवीत असावे. म्हणून या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर **“नाही!”** असे आहे. आपण मृतांच्या वतीने बापतिस्मा देत नाही.

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्भुत गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"* (रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास-आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"* (प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"* (रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्व होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌त कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Praying in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work—Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

| | |
|---|---|
| **किशोरवयीन मुलांसाठी** | **वर्तणूक विकार** |
| **वैयक्तिक सल्ला** | **व्यक्तिमत्व विकार** |
| **नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने** | **मानसिक भावनिक /** |
| **शिक्षेतील उणीव** | **अडचणी** |
| **कामाशी संबंधित समस्या** | **तणाव/आघात** |
| **कुटुंब/संपत्ती/विवाहपूर्व वैवाहिक** | **मद्यपान/अमली पदार्थांचे सेवन** |
| **पालक/मुले/भावंडे/समवयस्क** | **आध्यात्मिक समस्या** |
| | **लाईफ कोचिंग** |

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**

**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998

**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "ऑल पीपल्स चर्च," बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

**बँक खात्याचे नाव:** All Peoples Church
**बँक खाते क्रमांक:** 50200068829058
**IFSC क्रमांक:** HDFC0004367
**बँक:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout, Kalyan Nagar, Bengaluru - 560043, Karnataka

***कृपया लक्षात ठेवा:*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give.**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**


## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*

"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्‌त कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9:00 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो

**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

येशू ख्रिस्ताठायी विश्वासणारे म्हणून आमच्या प्रवासात बापतिस्मा हा एक महत्वपूर्ण अनुभव आहे. आम्ही सर्व ज्यांनी येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याचा आणि येशू ख्रिस्ताचे अनुसरण करण्याचा अनुभव घेतला आहे, आपल्या जीवनात कुठल्यातरी क्षणी हे महत्वाचे पाऊल उचलतील. पाण्याचा बापतिस्मा घेण्याची आज्ञा प्रभू येशू ख्रिस्ताने त्या सर्वांनी दिली आहे जे त्याच्या मागे चालण्याची निवड करतात. म्हणून या आज्ञेचे पालन केले पाहिजे. पाण्याचा बापतिस्मा घेण्याची तयारी करीत असतांना हा देवाच्या वचनाचा सोपा अभ्यास पाण्याच्या बापतिस्म्याचा अर्थ आणि महत्व समजण्यात आपली मदत करील.

आम्ही पाण्याच्या बापतिस्म्यासंबंधी सहा महत्वाची सत्ये येथे मांडणार आहोत:

1) पश्चातापाचे चिन्ह
2) सर्व धर्मचरण पूर्ण करणे
3) तुम्ही त्याचे शिष्य आहा ही साक्ष
4) येशू ख्रिस्ताठायी आपल्या विश्वासाची साक्ष
5) येशूसोबत आपल्या समानतेची साक्ष
6) उत्तम विवेकबुद्धीचा प्रतिसाद

आम्ही काही सामान्य प्रश्नांची उत्तरे देखील देत आहोत जी लोक पाण्याच्या बापतिस्म्याविषयी विचारतात.

All Peoples Church & World Outreach
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org